# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांचा संयुक्त उपक्रम)**

MMRC

**नोंदणीकृत कार्यालयः** एमएमआरसीएल ट्रांझिट कार्यालय, 'इ'– ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू, आयकर कार्यालय 'ए' विंगच्या मागे, वांद्रे–कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

## सार्वजनिक सूचनापत्र

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मेट्रो रेल्वे प्रशासन) 'मेट्रो लाइन – ३' प्रकल्प राबवत आहे. मेट्रो रेल्वे (बांधकाम) कायदा, १९७८ अंतर्गत मेट्रो रेल्वे प्रशासनाला मेट्रोच्या संरेखनालगत किंवा त्यावरील होणाऱ्या विकासाचे नियमन करण्याचे अधिकार आहेत.

'मुंबई मेट्रो लाइन–३' चे अंदाजे ६.३५ मीटर व्यास असलेले दोन (२) बोगदे, अंदाजे २०–२२ मीटर अंतरावर आणि जमिनीपासून १७–२५ मीटर खोलवर असून, मुंबई मेट्रो लाईन–३ संरेखनाच्या (नकाशात दाखवल्याप्रमाणे) दोन्ही बाजूस काही स्थावर मालमत्तेंच्या खाली येत आहेत.

वरील नमूद क्षेत्रान्तर्गत कोणत्याही विकास/पुनर्विकासामुळे मेट्रो बोगद्यांवर होणारा कोणताही प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी, मुंबई मेट्रो लाईन–३ संरेखनाच्या (५० मीटर प्रभाव क्षेत्राच्या) आत येणारे 'मालमत्ता मालक, जमीनदार, सोसायट्या, असोसिएशन आणि तत्सम संस्थाने यांनी कोणताही विकास / पुनर्विकास सुरू करण्यापूर्वी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून मंजुरी घेणे अनिवार्य आहे. तपशीलानुसार, नलिका किंवा विहिरी खोदणे, बांधकाम करने किंवा पाडणे, भू–तांत्रिक तपासणी, उत्खनन, कोणत्याही पायाभूत सुविधांची उभारणी किंवा विकासासाठी 'संचालक' (नियोजन आणि मालमत्ता विकास / एनएफबीआर), मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, यांच्याकडे अर्ज करून अनुमति प्राप्त करावी लागेल. याबाबत सर्व प्रकारची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन च्या वेबसाइटवर उपलब्ध केली गेली आहे (दिलेली लिंक पहा : https://mmrcl.com/en/project/noc).

वरील आवश्यकतांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यास कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

**–स्वाक्षांकित–**

**श्री. स्वेतल कनवाळू**

**उप महाव्यवस्थापक (नगर नियोजन)**




**Size 12 x 8_cm_Marathi**